शेवटी उंदरांचा विजय झाल




मराठी : अश्विनी बर्वे

एकदा जंगलाच्या बाजूला एका सुंदर निळ्या घरात दोन कलाकार बहिणी राहत होत्या. घराच्या बाहेर जंगलात उंदरांचा एक मोठा परिवार राहत होता. त्यातली एक सगळ्यात छोटी आणि सगळ्यात आकर्षक अश्या उंदरीचे नाव लुसी होते.

गोष्टीच्या सुरुवातीला लुसी दोन्ही बहिणींना कधीकाळी भेटायला जात असे. आणि प्रत्येक वेळी बहिणी तिला जंगल मध्ये परत आणून सोडत असत. त्या उंदरीणी तिला त्यांच्या घरी परत येवू नको असे म्हणत. पण लुसी त्यांचं म्हणणं समजू शकत नसे कलाकारांना आपल्या मुर्त्यांसाठी आणि चित्रांसाठी सुद्धा एक चांगल्या मॉडेलची गरज असते. लुसीला एवढंच माहित होतं की, दोघी बहिणी प्राण्यावर प्रेम करत होत्या. पण लुसी त्यांचं म्हणणं समजू शकत नसे. शेवटी दोन्ही बहिणींना त्यांची समजूत बदलावी लागली.

केटने लुसीच्या या आनंदमय गोष्टीत एक दृढ आणि आकर्षक उंदरीणीची कहाणी सांगितली आहे, जी स्वतःसाठी घर शोधत आहे...



जंगलाच्या बाजूला एका सुंदर अशा निळ्या घरात दोन कलाकार राहत होत्या. त्या दोघी बहिणी होत्या. घराच्या बाहेर जंगलात उंदरांचा एक मोठा परिवार राहत होता. त्यांच्यात सगळ्यात छोटी आणि सगळ्यात रोमांचकारी लुसी होती. तिने त्या बहिणींच्या विषयी ऐकलं होतं. की त्या कशा दिवसभर काम करतात आणि सुंदर वस्तू तयार करतात आणि त्या कशा जानवरांवर प्रेम करतात. मग एक दिवस लुसीने ठरवलं की त्यांच्या जवळ जावून राहायचं..

याआधी कोणत्याही उंदरीने कधी कोणत्या
घरात रहिवासी होण्याचा प्रयत्न केला नव्हता.





बहिणीनी लुसीला जंगलातल्या त्या जुन्या घरात परत सुरक्षित आणून सोडलं. डोरोथीने लुसीला सूर्यफुलाच्या बिया खायला दिल्या.गरटयुड म्हणाली, “इथे जंगलात तू मुक्तपणे राहू शकशील. तू आता परत आमच्या घरी येवू नको.”



त्या दोघी बहिणी काय म्हणाल्या, त्यातला एकही शब्द लुसीला कळला नाही. तिने आपल्या परिवाराची भेट घडवून आणल्याबद्दल त्यांचे आभार मानले. “स्क्विक! स्क्विक!”



पुढच्या वेळी जेव्हा लुसी त्या बहिणींच्या घरी परत आली तेव्हा ती आपली दोस्तांना घेवून आली. उंदरांनी गरट्‌युडला प्राण्याचे मॉडेल आणि मातीच्या मुर्त्या करतांना पाहिल्यावर त्यांना मजा वाटली.त्यांना स्वतःला मॉडेल व्हायला आवडलं.




रात्रीच्या वेळी लुसी आणि तिचे
दोस्त शांत चांदण्याच्या स्टुडीओ
मध्ये मुर्त्यांबरोबर झोपले.



दिवसा ते डोरोथीच्या स्टूडियो मधल्या कपाटावर झोपले, उंदरांना वाटलं की बहिणी त्यांना आपल्या घरात राहू देतील.




एक दिवस लूसी आणि तिच्या मित्रांनी डोरोथीने केलेल्या विशेष साखरेच्या कुकीजचा सुगंध घेतला आणि गार होण्यासाठी ठेवलेली बिस्किटे त्यांनी खाल्ली.





दोन्ही बहिणींना हे बिलकुल आवडलं नाही. त्यांनी उंदरांना पकडलं आणि त्यांना परत जंगलात घेवून गेल्या. त्यांनी उंदरांना म्हटलं, “आता तुम्ही कधी परत येवू नका.”

लूसी आणि तिचे दोस्त साखरेच्या कुकीज
बद्दल सगळ्यांना सांगण्यासाठी आपआपल्या
घरात धावले.





जंगलातल्या सगळ्या उंदरांमध्ये साखरेच्या कुकीजची बातमी पोहचली! आता सगळ्या उंदरांना त्याचा स्वाद घेण्याची घाई झाली होती.



आता पर्यंत दोघी बहिणी उंदरांना जंगलात परत परत सोडून थकल्या होत्या.
शेवटी गरट्युडने उंदरांच्या स्वागतासाठी काडेपेटीच्या पेट्या पलंगावर ठेवल्या आणि त्यात मऊ गाद्या ठेवल्या.


डोरोथीने त्यांना साखरेच्या कुकीजने भरलेली ताटली दिली. डोरोथीने त्यांच्या बाबत गोष्टी लिहल्या, त्यासाठी लूसी आणि तिच्या मित्रांनी आनंदाने पोज दिल्या.



उंदरांच्या बाबत लिहलेल्या गोष्टी
इतक्या प्रेमाने लिहल्या होत्या की जे
लोक उंदरांचा द्‌वेष करत होते,
ते उंदरांचे प्रशंसक झाले.







त्यातली एक गोष्ट अशा दोन स्त्रियांची होती, ज्यां स्वतः उंदरांच्या बरोबर राहायला शिकल्या होत्या. या उंदरांमध्ये लुसी नावाची उंदरीण सुद्धा होते. जी जंगलाच्या बाजूला असणाऱ्या निळ्या घरात आनंदाने राहत होती आणि साखरेच्या कुकीज खाऊन गोड गोड स्वप्नं बघत होती..

डोरोथी लेथ्रोप एक प्रसिद्ध लेखक आणि बालकथांची चित्रकार होती.

१९३८ मध्ये त्यांना पहिल्या कैल्डकोट पदकाने सम्मानित केले होते.

त्यांची बहीण गरट्यूड लेथ्रोप एक प्रसिद्ध मूर्तिकार होती आणि ती आपल्या काळातल्या अनेक राजकारणी हस्तींना ओळखत होती.

ज्यात एलेनोर रूझवेल्ट यांचा पण समावेश होता.

दोन्ही कलाकार प्राण्यांच्या अधिकाराबद्दल जागरूक होत्या. जेव्हा मी लहान होते, तेव्हा त्या दोन बहिणींना भेटण्याचे सौभाग्य मला मिळाले. तेव्हा त्या ८० वर्षांच्या होत्या, त्या दोघी चांगल्या कलाकार होत्या आणि प्राण्यांवर प्रेम करत होत्या.



समाप्त